05-05-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 5/4/2025 11:23 PM Page 1



# शक्तिपीठ महामार्गाला बांदा ग्रामसभेत एकमुखी विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि. ४ :** बांदा शहरातून जाणाऱ्या प्रस्तावित नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाला येथे आयोजित बांद्याच्या विशेष ग्रामसभेत एकमुखी विरोधाचा ठराव घेण्यात आला. बांदा बाजारपेठ ही विस्थापित होणार असून बाधित शेतकरी हे भूमिहीन व अल्पभूधारक होणार असल्याने या महामार्गाला सभेत तीव्र विरोध करण्यात आला. महामार्गाच्या विरोधात प्रशासनाशी लढण्यासाठी महामार्ग विरोधी कृती समितीची स्थापना यावेळी करण्यात आली.



बांदा : आयोजित विशेष ग्रामसभेत चर्चा करताना ग्रामस्थ.

या समितीच्या अध्यक्षपदी सरपंच प्रियांका नाईक यांची निवड करण्यात आली असून समितीच्या माध्यमातून लढा तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सह्यांची मोहीम राबवून स्थानिकांचा या महामार्गाला विरोध असल्याबाबत निवेदन देण्याचा ठराव घेण्यात आला. स्थानिक आमदार दीपक केसरकर यांनी शक्तिपीठ महामार्गाला समर्थन दिल्याने त्याचे पडसाद या विशेष ग्रामसभेत उमटले.

उपसरपंच राजाराम उर्फ आबा धारगळकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष ग्रामसभा संपन्न झाली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य राजाराम उर्फ बाळु सावंत, जावेद खतीब, प्रशांत बांदेकर, शामसुंदर मांजरेकर, साई काणेकर, रत्नाकर आगलावे, अनुजा वराडकर, दीपलक्ष्मी सावंत, शिल्पा परब, देवल येडवे, रिया येडवे, ग्रामविस्तार अधिकारी सौ. लीला मोर्ये, तलाठी फिरोज खान, वनपाल प्रमोद सावंत आदी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला उपसरपंच धारगळकर यांनी शक्तिपीठ महामार्गसाठी शहरातून जाणाऱ्या सर्वे नंबरचे वाचन केले. शहरातील एकूण ५८ सर्वे नंबर असल्याची माहिती त्यांनी दिली. शक्तिपीठ महामार्गमुळे बांदा बाजारपेठे पूर्णपणे विस्थापित होण्याचा मुद्दा गुरुनाथ सावंत यांनी उपस्थित केला. हा महामार्ग शहरातून न नेता पर्यायी मार्गाने स्थानिकांना विश्वासात घेऊन न्यावा. या महामार्गला आमचा विरोध नसून स्थानिक शेतकरी यामुळे विस्थापित होणार असतील तर आमचा तीव्र विरोध राहील.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने गुगल मॅपिंग करून त्याचे सर्वे नंबर आपल्या संकेतस्थळावर टाकले आहेत. त्यानुसार पानवळ येथील गोगटे-वाळके महाविद्यालयाकडून या महामार्गची सुरुवात होणार आहे. बळवंतनगर येथून हॉटेल कावेरी समोर सीमा तपासणी नाक्याकडे हा महामार्ग येणार आहे. याठिकाणी सीमा तपासणी नाक्यासाठी ३२ एकर जमीन संपादित करण्यात आली आहे. तसेच तिलारी उपकालवा व मुंबई गोवा चौपदरी महामार्ग यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी यापूर्वी संपादित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे शक्तिपीठसाठी पुन्हा जमिनी संपादित केल्यास स्थानिक शेतकरी हे पूर्णपणे विस्थापित होणार आहेत. तर काही शेतकरी हे भूमिहीन व अल्पभूधारक होणार आहेत. त्यामुळे या महामार्गला आमचा तीव्र विरोध असल्याचा सूर सर्वांनीच आळवला.

बाधित शेतकरी अरुण मोर्ये म्हणाले, याबाबत ग्रामपंचायत प्रशासनाने आपली भूमिका जाहीर करावी, आपल्यासोबत आम्ही सर्व ग्रामस्थ आहोत. याबाबत कृती समिती तयार करून त्याचे नेतृत्व सरपंच व ग्रामपंचायत लोकप्रतिनिधिनी करावे असा निर्णय घेण्यात आला. यावेळी कृती संघर्ष समितीच्या अध्यक्षपदी सरपंच प्रियांका नाईक यांची निवड करण्यात आली. या समितीत उपसरपंच आबा धारगळकर, सर्व १५ ग्रामपंचायत सदस्य व बाधित शेतकरी प्रमोद कामत, राजेश विरनोडकर, अरुण मोर्ये, अभय देसाई, प्रसाद गायतोंडे, आनंद गवस, ज्ञानेश्वर सावंत, गुरुनाथ सावंत, शामू धुरी, रामचंद्र वाळके, गजानन गायतोंडे, आनंद सावंत, रवी गवस, अवी पंडित, आपा चिंदरकर, राजेंद्र महाजन, विजय बांदेकर, राजू हडफडकर, प्रशांत सुटणकर, महेंद्र परब, भरत दळवी, नागेश सावंत यांची सर्वानुनाते निवड करण्यात आली.

पान १ वरून

## हत्येचा आरोपी रेल्वे डब्यात मृतावस्थेत

या प्रकरणी मडगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला असून, मृतदेह पुढील वैद्यकीय व कायदेशीर प्रक्रियेसाठी दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयात ठेवण्यात आला आहे.

## बोरी पुलाबाबत निर्णयात जाणीवपूर्वक वेळकाढूपणा

नाराजीचा सूर आहे. कायदेशीर प्रक्रिया सुरू असताना अधिकाऱ्यांकडून प्रकल्प पुढे रेटण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे.

## भारत-पाकिस्तान तणाव वाढला : पाकिस्तानचे विशेष अधिवेशन

भारत सरकारने पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान आणि पीपीपी अध्यक्ष बिलावल भुट्टो झरदारी यांचेही ट्विटर अकाउंट भारतात बंद केले आहे. याआधी पाकिस्तान सरकारचे अधिकृत 'एक्स' हँडल, संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ व माहिती आणि प्रसारण मंत्री अत्ताउल्लाह तरार यांची खातीही भारतात बंद करण्यात आली आहेत . दहशतवादी हल्ल्यानंतर हानिया आमिर, माहिरा खान यांच्यासह अनेक पाकिस्तानी सेलिब्रिटींची खाती ब्लॉक करण्यात आली आहेत.

## तांदळाच्या दोन नवीन जातींचं लोकार्पण

लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे. क्षारीय माती आणि किनारी खारटपणातही या जाताने उत्कृष्ट उत्पादन क्षमतेचा दाखला दिला आहे. आयसीएआरच्या मते, 'कमला' आणि 'पुसा तांदूळ १' यांची लागवड केल्यास ४.५ दशलक्ष टन अतिरिक्त भात उत्पादन होईल. यामुळे हरितगृह वायू उत्सर्जन २०% (३२,००० टन) कमी होईल. याशिवाय, 'कमला' जाताने सिंचनाची तीन वेळा बचत केली जाईल, ज्यामुळे इतर पिकांसाठी वापरता येईल असा ७,५०० दशलक्ष घनमीटर सिंचन पाणी वाचवता येईल.

# भगवान महावीर हायस्कूलचे योगासनामध्ये घवघवीत यश




■ टीम दैनिक हेराल्ड

**केरी, दि. ४ :** होंडा सत्तरी येथील भगवान महावीर सरकारी माध्यमिक विद्यालयाच्या मुलांनी योगासन स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. उत्तर गोवा जिल्हा पातळीवर योगासन स्पर्धेत हे यश त्यांनी संपादन केले आहे.

या स्पर्धेत १२ वर्षे खालील मुलांच्या वैयक्तीक योगासन गटांमध्ये दुसरे स्थान पटकावले प्रियेश सोलयेकर यांनी दुसरे स्थान प्राप्त केले. तर वेदांत सोलयेकर तिसरे स्थान प्राप्त केले. मुलींच्या वैयक्तिक योगासन गटामध्ये दुसरे स्थान इशा गावडे व तिसरे स्थान विधी सोलयेकर यांना प्राप्त झाले. १४ वर्षाच्या वैयक्तिक योगासन गटात तन्वेष गावडे यांना दुसरे, प्रद्युम गावडे यांना तिसरे तर मुलींमध्ये श्रेया फाळकर हिला तिसर स्थान मिळाले.

विद्यालयाच्या शारीरिक शिक्षण शिक्षिका सुलोचना संदेश बाराजणकर यांच्या मार्गदर्शनाखाली या मुलांनी हे यश संपादन केले. या यशाबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मोनाली नाईक तसेच प्रभारी मुख्याध्यापिका सारिका नाईक यांनी कौतुक केले आहे.

# डिचोलीत 'वर्ल्ड बुक डे' साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ४ :** डिचोली येथील नगरपालिकेच्या सरकारी तालुका ग्रंथालयात 'वर्ल्ड बुक डे' साजरा करण्यात आला. यावेळी डिचोलीच्या राधाकृष्ण विद्यालयाचे विद्यार्थ्यांसह शिक्षिका वर्षा चोडणकर उपस्थित होत्या.

सुरुवातीला सिद्धी भजे तिने सर्वांचे स्वागत केले. नंतर ग्रंथपाल तेजा परब यांनी मुलांना पुस्तकांचे महत्त्व सांगितले आणि ग्रंथालयाचे सभासद होऊन पुस्तक वाचण्यास सांगितले. या जागतिक पुस्तक दिनानिमित्त प्रमुख पाहुणे कवी नारायण खोर्जुवेकर यांची ओळख घनश्याम गावकर यांनी करून दिली. या दिनानिमित्त सुरक्षा कर्मचारी नवनाथ गोसावी, रामा माऊसकर उपस्थित होते. ग्रंथालयाचे कर्मचारी प्रतिमा आमोणकर, मीरा भोसले, स्मिता पाटील याही यावेळी हजर होत्या. प्रमुख पाहुणे खोर्जुवेकर म्हणाले विद्यार्थ्यांनी लेखकांची पुस्तके वाचून ज्ञान प्राप्त करुन विविध विद्या समजून घ्याव्यात. इतिहास, भूगोल, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, तर्कशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, समजून घ्यावे व प्रगल्भ व्हावे. नाटक, कथा, कादंबरी, गीत, कविता, आत्मचरित्र वाचावेत. तसेच वर्तमानपत्र व मासिकही वाचावे व हुशार व्हावे असे ते म्हणाले.ज शेवटी अस्मिता भिडे यांनी सर्व उपस्थित आमचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.



डिचोली : 'वर्ल्ड बुक डे' कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत नारायण खोर्जुवेकर, वर्षा चोडणकर व इतर.

# कायद्याची मोफत सेवा वरिष्ठ नागरिकापर्यंत पोहोचवा : अॅड. शिवाजी देसाई

■ टीम दैनिक हेराल्ड

**वाळपई, दि. ४ :** वरिष्ठ नागरिक हे समाजाचे महत्त्वाचे घटक आहेत. समाजात आज असंख्य वरिष्ठ नागरिक असे आहेत ज्यांना कायदा सेवेच्या पाठिंब्याची प्रचंड मोठी आवश्यकता आहे. वरिष्ठ नागरिकांना त्यांच्या उत्पन्नाच्या मर्यादेनुसार कायद्याची मोफत सेवा प्राप्त होत असते. वरिष्ठ नागरिकापर्यंत कायद्याची मोफत सेवा पोहोचणे आवश्यक आहे आणि त्याकरिता प्रत्येक गावात जनजागृती होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन अॅड शिवाजी देसाई यांनी वाळपईत वरिष्ठ नागरिकांच्या संदर्भातील कायदे या विषयावरील कायदा जनजागृती कार्यक्रमात केले. हा कार्यक्रम सत्तरी तालुका कायदा सेवा समिती आणि उत्तर गोवा कायदा सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

अॅड शिवाजी देसाई पुढे म्हणाले की प्रत्येक सरकारी कार्यालयामध्ये वरिष्ठ नागरिकांसाठी वेगळे काउंटर असणे आवश्यक आहे. वरिष्ठ नागरिकांना त्यांच्या मालमत्तेपासून त्यांची मुले बेदखल करू शकत नाही. तसे करण्याचा प्रयत्न केल्यास, किंवा वरिष्ठ नागरिकांचे त्यांच्या मुलांनी पालन पोषण न केल्यास वडिलोपार्जित मालमत्तेपासून त्यांच्या मुलांना कायद्याचा आधार घेऊन वंचित केले जाऊ शकते. प्रत्येक मुलाने आपल्या वरिष्ठ नागरिक आई-वडिलांचे पालन पोषण करणे हे त्या मुलाचे कर्तव्य. ज्या वरिष्ठ नागरिकांना मोफत कायदा सेवेची आवश्यकता असल्यास त्यांनी वाळपई येथील न्यायालयाच्या कार्यालयात संपर्क साधून त्या संदर्भातील अर्ज भरावा आणि आपल्या उत्पन्नासंदर्भातील तपशील सादर करावा असे ड शिवाजी देसाई शेवटी म्हणाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सागर सावंत, आणि मिलन तलावनिकर यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद लाभला.

# हणखणे सरकारी हायस्कुलमध्ये वाचन साधना कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ३० :** उन्हाळी शिबिरा अंतर्गत शासकीय माध्यमिक विद्यालय हणखणे येथे नुकतीच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात वाचनाचे महत्त्व विषद करण्यासाठी वाचन साधना कार्यशाळा झाली. निवृत्त शिक्षक सुभाष शेटगावकर यांनी या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांमधील वाचन वेग व आकलन क्षमता वाढविण्यासाठी वाचन विषयक प्रात्याक्षिके यावेळी करून घेण्यात आली. काना, मात्रा नसलेली व काना मात्रा असलेली अक्षरे पटकन ओळखण्याचा सराव, शास्त्रशुद्ध नजर फिरवण्याच्या सरावाने वाचन वेग वाढविणे, द्रुष्टिचा आवाका व रूंद पानावरील मजकुर भराभर वाचण्याचा सराव, वेगळे परंतु एकसारखेच वाटणारे शब्द पटकन ओळखण्याचा सराव म्हणजे शब्द बोध, वेगळी, परंतु एकसारखीच वाटणारी वाक्य पटकन ओळखण्याचा सराव आकलन म्हणजेच वाक्य बोध, एखाद्या वस्तूमधील समानता किंवा भिन्नता पटकन ओळखण्याचा सराव,

अर्थग्रहण : एखाद्या कृतीमधील समानता किंवा भिन्नता पटकन ओळखण्याचा सराव, वाचन कमी होण्याची कारणे व वाचनाची आवड निर्माण कशी करावी हे उदाहरणे देऊन श्री. शेटगावकर यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच वाचन करतानाचे आवश्यक असलेले तंत्र मंत्र त्याने स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक नरेंद्र नाईक यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांचे स्वागत केले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, वाचाल तर वाचाल हे वाक्य प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्या कायम स्मृती ठेवून अधिकाधिक वाचनाचा सराव वाढविला पाहिजे. वाचनाच्या सरावामुळे शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या अनेक समस्या दूर होण्यास मदत होणार. यावेळी आयोजित कार्यक्रमात व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षिका नीता पेडणेकर ,कार्यक्रमाचे संयोजक शिक्षिका मनीषा आडेलकर व राजकुमार देसाई उपस्थित होते. राजकुमार देसाई यांनी पाहुण्यांचा परिचय केला व शेवटी आभार मानले.




हणखणे : वाचन साधना कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना निवृत्त शिक्षक सुभाष शेटगावकर. सोबत मुख्याध्यापक नरेंद्र नाईक, नीता पेडणेकर, राजकुमार देसाई व मनीषा आडेलकर.

# तुये येथे 'ग्रामालोक' कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ४:** मौखिक साहित्य ते अक्षर साहित्य यांच्यात सेतू उभारण्याचे काम ग्रामालोक कार्यक्रमातून साहित्य अकादमी देशभरात करत असून त्यातून ग्रामीण भागातील लोककलाकार व साहित्यिक यांना प्रोत्साहन लाभत आहे, असे उद्गार प्रसिद्ध साहित्यिक व साहित्य अकादमीच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. पूर्णानंद च्यारी यांनी काढले.

डॉ. च्यारी ग्रामपंचायत तुये व कोकणी कलामाची पेडणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रामालोक कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर तुयेच्या सरपंच अनिता साळगावकर, उपसरपंच मनोहर पेडणेकर, पंच सदस्य सुलक्षा नाईक व स्वीटी नाईक उपस्थित होते.

तुयेचे पंच सदस्य उदय मांद्रेकर यांनी ग्रामपंचायतीच्या वतीने स्वागत केले. साहित्य अकादमीच्या कोकणी सल्लागार मंडळाचे सदस्य कवी शशिकांत पुनाजी यांनी प्रास्ताविक भाषणात ग्रामालोक कार्यक्रमाची संकल्पना मांडली.

त्यानंतर झालेल्या साहित्य सादरीकरण सत्रात संतोष महाले यांनी कथाकथन प्रा. प्रियांका परब यांनी लोकसाहित्य व लोक कला यावर विवेचन केले. जॉकिंम फर्नांडिस यांनी नाट्य सादरीकरण तर अद्वैत साळगावकर यांनी पेडणे कोकणी शैलीच्या विविध पैलूवर प्रकाश टाकला सायली आजगावकर यांनी काव्यवाचन केले.

मैथिली च्यारी यांनी गायलेल्या नमनने कार्यक्रमास प्रारंभ झाला. अशोक नाईक यांच्या नेतृत्वाखाली लोककलाकारांनी रोमट सादर केले. काजरेश्वर सेल्फे हेल्प ग्रुपने फुगडी तर मांगिरिश विद्यालय आरोबा व सरकारी प्राथमिक शाळा मधलावाडा पार्से यांनी लोकनृत्य सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रनिवेदन राशी परब हिने केले. तर कोकणी कलामाची पेडणेचे अध्यक्ष प्रकाश तळवणकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील सुमारे २०० लोक सहभागी झाले.




तुये : उद्घाटन प्रसंगी डॉ. च्यारी, सरपंच अनिता साळगावकर, उपसरपंच मनोहर पेडणेकर, सुलक्षा नाईक व स्वीटी नाईक.

**CHANGE IN NAME**

I, **LYNWEN ANNETTE SEQUEIRA** R/O H NO 121/A, GRANDE, CARMONA, BARDEZ, GOA. like to change my name from **LYNWEN ANNETTE D SOUZA** to **LYNWEN ANNETTE SEQUEIRA.** Hereafter in all my dealing and documents I will be known by the name **LYNWEN ANNETTE SEQUEIRA.**

**CHANGE OF NAME**

I, **SERGIO D'COSTA** Resident of H No 360, Durgawadi Taleigao, Tiswadi Goa has change my name from **SERGIO GODWIN DA COSTA** to **SERGIO D'COSTA.** Hereinafter in all my dealings and documents I will be known by new name of as **SERGIO D'COSTA.**

**CHANGE IN NAME**

I, **EDNA DOMNIC COELHO** R/o, H. no-19, Igrez Wado Marna, Siolim, Bardez Goa, would like to change my name from **EDNA SAMUEL THOMPSON** TO **EDNA DOMNIC COELHO**. Hereafter all my documents and dealing will be known by the name **EDNA DOMNIC COELHO.**

# मांद्रेतील डोंगर माळरानाला आग; २० लाखापेक्षा जास्त नुकसानी


■ टीम दैनिक हेराल्ड

**मांद्रे, दि. ४ :** येथील पंचायत क्षेत्रातील नाईक वाडा आस्कावाडा डोंगर माळरानावर आग लागून काजू बागायती सहित विविध प्रकारची झाडे मिळून २० लाखापेक्षा जास्त नुकसाने बागायतदार शेतकऱ्यांना झाली आहे.

डोंगर माळरानावर आगे लावण्याचे प्रकार हल्ली मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. डोंगर माळरानावरील जमिनी बिगर गोमंतकीय दिल्ली वाल्यांनी विकत घेतलेले आहेत. कधीकधी साफसफाई करताना किंवा मुद्दाम आगे लावून या डोंगर माळरानावर असलेल्या काजूची बागायती इतर झाडांची नासाडी करून बिगर शेतीत रूपांतर करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

चार रोजी दुपारी आस्कवाडा मांद्रे डोंगर माळरानावर आग लागली ती आग पुढे पुढे साळगावकरवाडा नाईकवाडा पर्यंत पोचली आग विझवण्याचा स्थानिकांनी प्रयत्न केला घटनास्थळी अग्निबंब जाण्यासाठी मार्गच मोकळे नव्हते. या भागातील मोठ्या प्रमाणे डोंगर माळराने दिल्लीवाल्या भागातील नागरिकांनी विकत घेतलेली आहेत.

या डोंगरमाळ रानावरील काही खाजगी काजूंची झाडे सागवानच लाकडी जळून जाण्याचा प्रकार घडलेला आहे. या आगीमुळे वीस लाखापेक्षा जास्त नुकसानी झाल्याची माहिती स्थानिक शेतकरी देतात.



मांद्रे : नाईकवाडा डोंगरावर लागलेली आग.

# मोरगाव देव म्हाताराबाबा मंदिराचा आज वर्धापनदिन सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि. ४ :** प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही मोरगाव येथील प्रसिद्ध जागृत देवस्थान श्री देव म्हाताराबाबा मंदिर वर्धापन दिन सोहळा सोमवार दि. ५ रोजी साजरा होणार आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

सकाळी ८ वाजता श्री देवी माऊली पंचायतन देवतांचे समारंभस्थळी आगमन, सकाळी ९ ते ९.३० श्री देव म्हाताराबाबा मूळ स्थानावर व मंदिर आसनावर अभिषेक, सकाळी १० ते १२ श्री सत्यनारायण महापूजा दुपारी १२ वाजता महाआरती, दुपारी १ ते ४ महाप्रसाद व तीर्थप्रसाद संध्याकाळी ४ ते ६ मोरगाव सामस्थांचे भजन, ६ ते ७ पावणी कार्यक्रम, ७ ते ७.३० सांजआरती, रात्री ८ ते ९.३० स्वरधारा भजन मंडळ तांबुळी बुवा अमित तांबोळकर यांचे भजन, रात्री १० वाजता श्री कलेश्वर पारंपरिक दशावतार नाट्यमंडळ, नेरुर प्रस्तुत नवीन ट्रिकसीनयुक्त नाट्यप्रयोग त्रिखुर ब्रह्मांड प्रलय सादर होणार आहे.



सर्व भाविकांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन देवदर्शन, तीर्थप्रसाद, महाप्रसाद व विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त मोरगाव ग्रामस्थ व श्री देव म्हाताराबाबा देवस्थान कमिटी मोरगांव यांच्यावतीने करण्यात आले आहे.